11 OCT 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम शेती इन्क्युबेशन सेंटरमुळे शेतकऱ्यांचा प्रवास सुकर

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : रेशीम शेती इन्क्युबेशन सेंटर विद्यापीठात कार्यान्वित, लाइफ सायन्समधील देशातील पहिले केंद्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठात कार्यान्वित करण्यात आलेल्या रेशीम शेती इन्क्युबेशन सेंटरमुळे विद्यार्थ्यांचा आणि शेतकऱ्यांचाही ज्ञानार्जनातून अर्थार्जनाकडील प्रवास सुकर होणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इन्क्युबेशन इन सेरीकल्चर या केंद्राचे उद्घाटन झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या उद्घाटनाच्या निमित्ताने उस्मानाबाद जिल्ह्यातील ५५ शेतकऱ्यांसाठी दि. ८ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत या इन्क्युबेशन केंद्राच्या अंतर्गतच 'एकात्मिक रेशीम शेती' या विषयावरील प्रशिक्षण शिबिरही आयोजित करण्यात आले आहे.



कोल्हापूर : प्राणिशास्त्र अधिविभागात इन्क्युबेशन सेंटरअंतर्गत शेतकऱ्यांसाठी रेशीम शेतीविषयक प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, लाईफ सायन्स या विषयामधील रेशीम शेतीशी निगडित भारतातील हे पहिले इन्क्युबेशन सेंटर आहे. इन्क्युबेशन सेंटरची योजना अशासाठी असते की, विद्यार्थी अगर नागरिकांना नोकरीऐवजी स्वतःचा रोजगार सुरू करता यावा आणि त्या माध्यमातून इतर गरजू लोकांनाही रोजगार देता यावा. त्यादृष्टीने या रेशीम शेती इन्क्युबेशनमध्ये रोजगार निर्मितीची पुरेपूर क्षमता आहे.

दरम्यान, या एक आठवड्याच्या निवासी प्रशिक्षण कार्यक्रमात जमिनीची तयारी, निवड, खताचे, पाण्याचे महत्त्व, चॉकी व प्रौढ रेशीम कीटक संगोपन, निर्जंतुकीकरण, तुती व रेशीम कीटकांचे विविध रोग व कीड कोष बांधणी, विक्री, रेशीम शेतीतील मूल्यवर्धित उत्पादने, धागानिर्मिती, शासकीय योजना अशा विविध विषयांवर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, कृषी म्हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. जी. खोत, समृद्धी उद्योग समूहाचे मनीष पाटील, उस्मानाबादचे प्रगतिशील रेशीम शेती उत्पादक बालाजी पवार आदी उपस्थित होते. प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी आभार मानले.

पुढारी



**कोल्हापूर : विद्यापीठात सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इन्क्युबेशन इन सेरिकल्चर केंद्रातर्फे आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.**

# रेशीम शेतीतून इतर उत्पादने घेण्यास 'इन्क्युबेशन'च्या माध्यमातून चालना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

रेशीम शेतीतून इतर मूल्यवर्धित उत्पादने घेण्यास इन्क्युबेशन केंद्राच्या माध्यमातून चालना मिळेल. रेशीम शेतीतून उत्पादकता व गुणवत्ता वाढविण्यास याचा फायदा होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

प्राणीशास्त्र अधिविभागात सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इन्क्युबेशन इन सेरिकल्चर केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी इन्क्युबेशन केंद्रांतर्गत एकात्मिक रेशीम शेती या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम झाला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. के. कामत, मनीष पाटील, डॉ. जी. जी. खोत यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. बी. एस. मन्ने, बालाजी पवार आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात 'रेशीमशेती इन्क्युबेशन' कार्यान्वित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

## ▪ लाईफ सायन्समधील देशातील पहिले केंद्र
## ▪ उस्मानाबाद येथील शेतकऱ्यांना प्रशिक्षण

शिवाजी विद्यापीठात कार्यान्वित करण्यात आलेल्या रेशीम शेती इन्क्युबेशन सेंटरमुळे विद्यार्थ्यांचा आणि शेतकऱ्यांचाही ज्ञानार्जनातून अर्थार्जनाकडील प्रवास सुकर होणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे व्यक्त केले.

प्राणीशास्त्र अधिविभागात सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इन्क्युबेशन इन सेरीकल्चर या केंद्राचे उद्घाटनावेळी डॉ. शिंदे बोलत होते. या उद्घाटनाच्या निमित्ताने उस्मानाबाद जिल्ह्यातील ५५ शेतकऱ्यांसाठी इन्क्युबेशन केंद्राच्या अंतर्गत एकात्मिक रेशीम शेती या विषयावरील प्रशिक्षण दिले जाणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, उस्मानाबाद जिल्ह्यातून रेशीम शेतीचे निवासी प्रशिक्षण घेण्यास अकृषी विद्यापीठात शेतकरी येतात, ही अभिमानाची बाब आहे.

यावेळी इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य



शिवाजी विद्यापीठातून

डॉ. जी. जी. खोत, समृद्धी उद्योग समूहाचे मनीष पाटील, उस्मानाबादचे प्रगतशील रेशीम शेती उत्पादक बालाजी पवार आदी उपस्थित होते. प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ व्ही. एस. मन्ने यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी आभार मानले.

**भारतातील पहिले इन्क्युबेशन सेंटर**

लाईफ सायन्स या विषयामधील रेशीम शेतीशी निगडित भारतातील हे पहिले इन्क्युबेशन सेंटर आहे. इन्क्युबेशन सेंटरची योजना अशासाठी असते की, विद्यार्थी अगर नागरिकांना नोकरीऐवजी स्वत:चा रोजगार सुरू करता यावा आणि त्या माध्यमातून इतर गरजू लोकांनाही रोजगार देता यावा. त्या दृष्टीने या रेशीम शेती इन्क्युबेशनमध्ये रोजगार निर्मितीची पुरेपूर क्षमता असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2018
Times of India

# Varsity opens incubation centre for sericulture

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** A centre at Shivaji University, Kolhapur (SUK) could well become the one-stop centre for all things related to sericulture. The incubation centre for sericulture, inaugurated earlier this week, will serve students, farmers, as well as industry.

Integrated research, field visits, transfer of technology, and dissemination of technology will be the first priority in the incubation lab, said AD Jadhav, programme coordinator at the Department of Zoology, SUK.

Jadhav said at the first programme after its inauguration, 55 farmers from Osmanabad district enrolled for the five-day training on the various aspects of sericulture. The programme will conclude on October 13. All these farmers have arrived

**55 farmers from Osmanabad district enrolled for the five-day training on the various aspects of sericulture. The programme will conclude on October 13. All these farmers have arrived under the sponsorship of the district administration of Osmanabad.**

under the sponsorship of the district administration of Osmanabad. They plan to send 500 more farmers interested in sericulture.

"The exposure to proper practices in the field of sericulture is much needed to get proper yield. We have many success stories from the surrounding region, where farmers have earned in the lakhs with their harvest," he said.

Balaji Powar, one of the farmer participants, said that the training that they are receiving at the Department of Zoology of SUK will stand them in good stead. "The field visit to nearby farmers, inspires one with confidence," he said.

Devanand Shinde, VC, SUK on the day of inauguration of the incubation centre said this is the first incubation centre associated with the life sciences in the country.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2018
पुण्यनगरी

# मानसिक आरोग्य दिनानिमित्त विद्यापीठात पोस्टर प्रदर्शन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या मानसशास्त्र अधिविभागातर्फे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'आजचे युवक व मानसिक आरोग्य' या विषयावर पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले.विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते बुधवारी सकाळी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आजच्या युवा पिढीसमोर मानसिक आरोग्याची समस्या उभी ठाकली आहे. इंटरनेट ॲडिक्शन, ताण-तणाव, व्यसनाधिनता याचबरोबरच नैराश्यातून आत्महत्येची समस्या भेडसावत आहे.

यामध्ये उच्च शिक्षित तरुण, तरुणींचा किरकोळ कारणांवरून आत्महत्या करण्याकडे कल वाढत आहे. यातून बाहेर पडण्यासाठी तरुणाईचे मानसिक आरोग्य सुधारण्याची गरज आहे. त्यासाठी या अधिविभागाने प्रयत्न करावा. प्रदर्शन १२ ऑक्टोबरपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. याप्रसंगी मानसशास्त्र अधिविभागाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, प्रा. अमोल कांबळे यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख आदी उपस्थित होते.

पुढारी

# मानसिक आरोग्य दिनानिमित्त विद्यापीठात पोस्टर प्रदर्शन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या मानसशास्त्र अधिविभागामार्फत जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'आजचे युवक व मानसिक आरोग्य' या विषयावर पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मानसशास्त्र अधिविभागाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, प्रा. अमोल कांबळे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, आजच्या युवा पिढीसमोर मानसिक आरोग्याची समस्या उभी ठाकली आहे. यामध्ये उच्चशिक्षित तरुण, तरुणींचा किरकोळ कारणांवरून आत्महत्या करण्याकडे कल वाढत आहे. यातून बाहेर पडण्यासाठी तरुणाईचे मानसिक आरोग्य सुधारण्याची गरज आहे. त्यासाठी या अधिविभागाने प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रदर्शन १२ ऑक्टोबरपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहणार असून, त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2018
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ हिंदी विभागात आज चर्चासत्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये दि. ११ आणि १२ ऑक्टोबर रोजी 'अभिकलनात्मक भाषा विज्ञान तथा भारतीय भाषा संगणन' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रामध्ये कर्नाटक, आसाम, केरळ, गुजरात, पंजाब, गोवा आदी राज्यांतून विविध विद्यापीठांतील प्राध्यापक उपस्थित राहणार आहेत.

चर्चासत्राचे उद्घाटन नेदरलँड येथील युरोपियन युनिव्हर्सिटी ऑफ ईस्ट अँड वेस्टचे माजी कुलगुरू मोहन गौतम यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिस्ट सी-डैक, पुणे केंद्राचे अध्यक्ष, महेश कुलकर्णी, सुरेश माहेश्वरी, पांडुरंग पाटील, वसंत मोरे, लखनौ येथील नीलाभ श्रीवास्तव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे चर्चासत्राचे अध्यक्षपद भूषवणार आहेत. चर्चासत्रास प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर, वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2018

कुमारकांती



# सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त विद्यापीठात एन.सी.सी.संचलन

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व शहीद स्मृती केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर शनिवार, दि.२९ सप्टेंबर रोजी सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. तसेच, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी, विद्यार्थीनींनी देशभक्तीपर पथनाटयाचे सादरीकरण केले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी.पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर.मोरे, उपकुलसचिव डॉ.व्ही. एन.शिंदे यांचेसह विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 OCT 2018
तरुण भारत

# सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त विद्यापीठात एनसीसी संचलन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व शहीद स्मृती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी, विद्यार्थीनींनी देशभक्तीपर पथनाट्याचे सादरीकरण केले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# कोल्हापूरचा खासबारदार अजिंक्य

## जलद बुद्धिबळ स्पर्धा; सातारचा जोतिरादित्य जाधव उपविजेता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पंधराशे गुणांकनाखालील एक दिवसीय खुल्या जलद बुद्धिबळ स्पर्धेत सातव्या मानांकित कोल्हापूरच्या सोहम खासबारदार याने आठपैकी आठ गुण मिळवून अजिंक्यपद पटकावले. सातारचा ज्योतिरादित्य जाधव सात गुण मिळवून उपविजेता ठरला. अठ्ठाविसाव्या मानांकित कोल्हापूरचा प्रणव पाटीलने सात गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.



गटनिहाय स्पर्धेतील विजेते असे : खुला गट : अभिषेक पाटील, अनिकेत बापट (सातारा), श्रुती गुरव (कोल्हापूर), मयांक च्युलेट (बेळगाव), अनिकेत रेडिज (रत्नागिरी), आयुष महाजन (कोल्हापूर), सिद्धेश यादव (सांगली), बिगर गुणांकित गट : सन्मित शहा (सांगली), आकाश शेवते (वाई), नीलेश पुजारी (बेळगाव), शुभम कांबळे (इचलकरंजी), सुरेश भोसले, कुणाल सकपाळ (सातारा), तीर्थलिंग शेफाली (रायगड), रेहान महात (सांगली), राहुल शहा (बेळगाव), संकेत नाटेकर (सांगली), गुणांकन १००० ते ११५० : यश पंढरपुरे (सांगली), तुषार घुणके (कारदगा), सम्मेद पाटील (इचलकरंजी), समृद्धी कुलकर्णी (कोल्हापूर), श्रावणी बोरकर (कोल्हापूर), गुणांकन ११५१ ते १३०० गट : शर्विल पाटील, वरद आठल्ये (कोल्हापूर), संकेत महाडेश्वर (सिंधुदुर्ग), ईशा कोळी (सातारा), सारंग पाटील (कोल्हापूर), उत्कृष्ट ज्येष्ठ बुद्धिबळपटू : बी. एस. नाईक (कोल्हापूर), दिलीप कुलकर्णी (सांगली), महिला : पूर्वा सप्रे (कोल्हापूर), रजनी झांबरे (कोल्हापूर), दिव्यांग बुद्धिबळपटू : अभिजित कोल्हापूर, यश गोगटे (रत्नागिरी), दत्तात्रेय वाडेकर (कोल्हापूर), सोळा वर्षांखालील : मयुरी सावळकर, तृप्ती प्रभू, अर्चना चव्हाण (कोल्हापूर), स्वप्निल गुडवे (कारदगा), रितेश केसरे (कोल्हापूर), सय्यद अमीन (सातारा), प्रज्वल जोशी (सांगली), ऋषीकेश तिबिले (कोल्हापूर), कौस्तुभ गोते (इचलकरंजी), पार्थ मकोटे (कोल्हापूर), १३ वर्षांखालील : अथर्व पंढरपूर (सातारा), मानस भिडे (देवगड), ओंकार सावर्डेकर (चिपळूण), ईशान शेख (सातारा), मिहीर सकपाळ (सातारा), श्रेया दाईंगडे (जयसिंगपूर), हर्शिता काटे (वारणानगर), अभिजित जावळे (इचलकरंजी), रईस खान (बेळगाव), परीक्षित रोग्गणावर (सातारा), दहा वर्षांखालील : यश भागवत (कोल्हापूर), दिशा पाटील, दिव्या पाटील (जयसिंगपूर), अवनीश हंडूर (कोल्हापूर), ध्रुव गांधी (इचलकरंजी), आयन बैरागडे (इचलकरंजी), नील मंत्री (कोल्हापूर), प्रज्वल वरूडकर (बेळगाव), समित सावंत, शंतनू पाटील (कोल्हापूर), सात वर्षांखालील : अनिरुद्ध दासरी (सातारा), ऋतुराज पांचाळ (रत्नागिरी), राज कांबळे (इचलकरंजी), अर्णव शेडगे, आयुष हतगिणे (कोल्हापूर), इशिता काटे (वारणानगर), सर्जे राव काटीवाले (बेळगाव), सौम्या कुलकर्णी, रीना कोल्हापूर, श्याम देशपांडे (कोल्हापूर), लहान गट : मिहीर शहा, मनवा देशपांडे (कोल्हापूर).

उद्योगपती प्रवीण शहा, अजितसिंह काटकर यांच्या हस्ते व भरत पाटोळे, बी. एस. नाईक, दयानंद साजन्नावर, महिपाल मिरजे, भरत चौगुले, मनीषा मारुलकर, उत्कर्ष लोमटे, प्रीतम घोडके, पुष्कराज जाधव उपस्थित होते.

डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी क्लबच्या वतीने व कोल्हापूर चेस ॲकॅडमीच्या सहकार्याने स्पर्धा आयोजित केल्या होत्या.